प्रकरण ।

# राज्याच्या वित्ताचा आढावा

# प्रकरण I: राज्याच्या वित्ताचा आढावा

## 1.1 राज्याची रूपरेखा

महाराष्ट्र राज्य देशाच्या पश्चिम-मध्यवर्ती विभागात स्थित आहे. ह्याला अरबी समुद्राचा विस्तीर्ण किनारा (720 किलोमीटर) लाभला आहे. भौगोलिक क्षेत्राच्या (3.08 लाख चौरस किलोमीटर) तुलनेत राज्याचा तिसरा क्रमांक आहे आणि 2011 च्या जनगणनेनुसार देशाच्या एकूण लोकसंख्येच्या 9.28 टक्के आहे. या राज्यात 36 जिल्हे आहेत. राज्याशी संबंधित सामान्य माहिती **परिशिष्ट 1.1** मध्ये दर्शविली आहे.

### 1.1.1 स्थूल राज्य उत्पन्न

स्थूल राज्य उत्पन्न म्हणजे दिलेल्या कालावधीत राज्याच्या सीमेत उत्पादित केलेल्या सर्व अधिकृतपणे मान्यताप्राप्त मालांची व सेवांची किंमत. स्थूल राज्य उत्पन्नामध्ये क्षेत्रीय योगदानातील बदल समजून घेणे महत्वाचे आहे कारण ते अर्थव्यवस्थेच्या बदलत्या संरचनेचे संकेत देतात. आर्थिक कार्यक्रम हे साधारणपणे प्राथमिक, द्वितीय आणि तृतीय क्षेत्रांमध्ये विभागण्यात आले आहेत जे कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रांशी संबंधित आहेत.

सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्नाच्या वार्षिक वाढीच्या दराचा कल **तक्ता 1.1** मध्ये दर्शविलेला आहे.

**तक्ता 1.1: देशांतर्गत स्थूल उत्पन्नाच्या तुलनेत स्थूल राज्य उत्पन्नाचा कल**

**(₹ कोटी मध्ये)**

| वर्ष | 2017-18 | 2018-19+++ | 2019-20++ | 2020-21+ | 2021-22$ |
|---|---|---|---|---|---|
| सांकेतिक देशांतर्गत स्थूल उत्पन्न (2011-12 मालिका) | 17090042 | 18899668 | 20074856 | 19800914 | 23664637 |
| मागील वर्षाच्या तुलनेत देशांतर्गत स्थूल उत्पन्नाचा वृद्धी दर (टक्क्यांमध्ये) | 11.03 | 10.59 | 6.22 | (-) 1.36 | 19.51 |
| सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न **(2011-12 मालिका)** | 2352782 | 2567897 | 2734552 | 2711685 | 3197782 |
| मागील वर्षाच्या तुलनेत सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्नाचा वृद्धी दर (टक्क्यांमध्ये) | 7.03 | 9.14 | 6.49 | (-) 0.84 | 17.93 |


स्त्रोतः MOSPI, भारत सरकार (https://mospi.gov.in/web/mospi/download-tables-data/-/reports/view) आणि महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण 2021-22

$: पूर्वानुमानानुसार अंदाज; +:प्रथम सुधारित अंदाज; ++ द्वितीय सुधारित अंदाज; +++तृतीय सुधारित अंदाज;

**आलेख 1.1** 2021-22 मधील क्षेत्रीय योगदानाचे चित्रण करतो, गेल्या पाच वर्षांच्या म्हणजेच, 2017-18 ते 2021-22 कालावधीत स्थूल राज्य उत्पन्नामधील क्षेत्रीय योगदानातील बदल **आलेख 1.2** मध्ये तपशीलवार दर्शविले आहेत.

**आलेख 1.1: स्थूल राज्य उत्पन्नाच्या क्षेत्रीय योगदानावरील बदल 2017-18 ते 2021-22 (आगाऊ अंदाज)**

टक्क्यांमध्ये




(स्त्रोतः महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण 2021-22)


**आलेख 1.1** असे दर्शविते की 2017-18 च्या तुलनेत 2021-22 या कालावधीत स्थूल राज्य उत्पन्नामधील उद्योग क्षेत्राचा सापेक्ष वाटा लक्षणीयरित्या कमी झाला, तर कृषी आणि सेवा क्षेत्रात किरकोळ वाढ झाली.

## 1.1.2 चालू किंमतीवर स्थूल राज्य उत्पन्नामध्ये क्षेत्रीय वृद्धी

कोविड-19 महामारीच्या प्रतिकूल परिणामातून सावरताना, उद्योग आणि सेवा क्षेत्राने मागील वर्षाच्या तुलनेत 11.9 टक्के आणि 13.5 टक्के स्थिर वाढ नोंदवली, तर कृषी क्षेत्राची वाढ **आलेख 1.2** मध्ये दर्शविल्यानुसार 4.4 टक्क्यांपर्यंत घसरली.

**आलेख 1.2: स्थूल राज्य उत्पन्नामध्ये क्षेत्रीय वाढ 2017-18 ते 2021-22**

टक्क्यांमध्ये




| | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
|---|---|---|---|---|---|
| कृषि | -1.0 | -1.5 | 19.9 | 14.8 | 4.4 |
| उद्योग | 8.7 | 9.3 | -1.3 | -6.2 | 11.9 |
| सेवा | 9.9 | 11.4 | 10.4 | -1.6 | 13.5 |

(स्त्रोतः महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण 2021-22)

(2018-19: तृतीय सुधारित अंदाज; 2019-20: द्वितीय सुधारित अंदाज; 2020-21: प्रथम सुधारित अंदाज; 2021-22: पूर्वानुमानानुसार अंदाज)

## 1.2 राज्य वित्त लेखापरीक्षा अहवालाचा आधार आणि दृष्टिकोण

भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151(2)च्या अनुसार राज्याच्या लेख्यांसंबंधित भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचा अहवाल राज्याच्या राज्यपालांकडे सादर करण्यात यावा, जे तो अहवाल विधिमंडळात सादर करतील. राज्य वित्त व्यवस्थेवरील लेखापरीक्षा अहवाल भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 151(2) अंतर्गत तयार आणि सादर करण्यात येतो.

प्रधान महालेखाकार (लेखा व हकदारी)-I, महाराष्ट्र राज्याचे वित्त लेखे आणि विनियोजन लेखे दरवर्षी तयार करतात. अशाप्रकारचे लेखे राखण्यासाठी जबाबदार असणारी कोषागारे, कार्यालये आणि विभागाद्वारे सादर करण्यात येणारे मूळ/प्रारंभिक आणि सहाय्यक लेखे तसेच भारतीय रिझर्व बँकेकडून प्राप्त विवरण यावरून दरवर्षी राज्याचे वित्त लेखे आणि विनियोजन लेखे तयार करतात. महालेखाकार (लेखापरीक्षा)-II, महाराष्ट्र द्वारे ह्या लेख्यांचे स्वतंत्रपणे लेखापरीक्षण करण्यात येते आणि ते भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षकांद्वारे प्रमाणित करण्यात येते.

राज्याचे वित्त लेखे आणि विनियोजन लेखे या अहवालाची मूळ माहिती गठित करतात, इतर स्त्रोतांचा विचार करून विश्लेषण देखील केले जाते ज्यात खालील बाबींचा समावेश आहे:

- राज्याचा अर्थसंकल्पः राजकोषीय मापदंड आणि वाटपाची प्राथमिकता जसे अंदाज निर्धारित करण्यासाठी तसेच त्याच्या अंमलबजावणीच्या परिणामकारकतेचे मूल्यमापन आणि संबंधित नियम आणि विहित कार्यपद्धतींचे अनुपालन;
- महालेखाकार (लेखापरीक्षा)-I आणि II, महाराष्ट्र कार्यालयांद्वारे लेखापरीक्षेची परिणती करणे;
- विविध शासकीय विभाग, कोषागारे आणि संस्था यांच्याकडून मिळवलेला इतर वित्तीय डेटा;
- स्थूल राज्य उत्पन्न माहिती आणि इतर राज्याशी संबंधित सांख्यिकी, अर्थशास्त्र आणि सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन;
- पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारशी;
- महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम, 2005;
- भारत शासनाकडून मार्गदर्शक तत्वे.

## 1.3 अहवाल संरचना

राज्याचा वित्त लेखापरीक्षा अहवाल खालील पाच प्रकरणांत संरचित केला आहेः-

| | |
|---|---|
| **प्रकरण - I** | **राज्याच्या वित्ताचा आढावा**<br>या प्रकरणांत अहलावाचा आधार आणि दृष्टिकोनाचे वर्णन केले आहे आणि खालील डेटा मध्ये शासकीय लेख्यांच्या संरचनेचा आढावा, अर्थसंकल्पीय पद्धती/प्रक्रिया, मुख्य निर्देशांकाचे अति सूक्ष्म राजकोषीय विश्लेषण निर्धारण आणि तूट/आधिक्य यासह राज्याची राजकोषीय स्थिती दर्शविली आहे. |
| **प्रकरण - II** | **राज्याचे वित्त**<br>या प्रकरणांत राज्याच्या वित्त व्यवस्थेचा व्यापक दृष्टिकोन, मागील वर्षाच्या तुलनेत मोठ्या राजकोषीय घटकांमध्ये झालेल्या महत्वपूर्ण बदलांचे विश्लेषण, 2017-18 ते 2021-22 या कालावधीचा एकंदर कल, राज्याच्या वित्त व्यवस्थापनावर आधारित राज्याच्या कर्जाचा आकृतिबंध आणि सार्वजनिक खाते व्यवहार दर्शविण्यात आले आहे. |
| **प्रकरण - III** | **अर्थसंकल्पीय व्यवस्थापन**<br>हे प्रकरण राज्याच्या विनियोजन लेख्यांवर आधारित आहे आणि राज्य शासनाचे विनियोजन आणि वाटप प्राथमिकतेचा आढावा आणि अर्थसंकल्प व्यवस्थापनाशी संबंधित घटनात्मक तरतुदींमधील विचलनावरील अहवाल |
| **प्रकरण - IV** | **लेख्यांची गुणवत्ता आणि वित्तीय अहवाल पद्धती**<br>या प्रकरणात राज्य शासनाच्या विविध प्राधिकाऱ्यांद्वारे प्रस्तुत करण्यात आलेल्या लेख्यांची गुणवत्ता आणि राज्य शासनाच्या विविध विभागीय कर्मचाऱ्यांद्वारे विविध वित्तीय नियम आणि शिफारसींसह अनुपालन सादर न करण्याच्या मुद्द्यांवर भाष्य करण्यात आले आहे. |
| **प्रकरण - V** | **राज्य सार्वजनिक उपक्रमांची वित्तीय कामगिरी**<br>हे प्रकरण शासकीय कंपन्या आणि वैधानिक महामंडळांची आर्थिक कामगिरी सादर करतो. राज्य शासकीय सार्वजनिक उपक्रम मध्ये कंपनी कायदा, 2013 अंतर्गत स्थापन केलेल्या राज्य सरकारच्या मालकीच्या कंपन्या आणि संसदेने लागू केलेल्या कायद्यांतर्गत स्थापन केलेल्या वैधानिक महामंडळांचा समावेश होतो. |

## 1.4 राज्य शासन लेखा ढाचा आणि अर्थसंकल्पीय प्रक्रियेचा आढावा

राज्य शासनाचे लेखे तीन भागांत ठेवण्यात येतातः

### 1. राज्याचा संचित निधी (भारतीय संविधानाचा अनुच्छेद 266(1))

या निधीमध्ये राज्य शासनाद्वारे प्राप्त सर्व महसूल, राज्य शासनाद्वारे उभारण्यात आलेले सर्व कर्ज (बाजार ऋण, बंधपत्र, केंद्र शासनाकडून मिळालेली कर्जे, वित्तीय संस्थांकडून प्राप्त कर्ज, राष्ट्रीय लघु बचत निधीला बहाल करण्यात आलेल्या विशेष सुरक्षा इत्यादि), भारतीय रिझर्व्ह बँक द्वारे विस्तारित अर्थोपाय अग्रिम आणि कर्जाच्या परतफेडीच्या स्वरूपात राज्य शासनाद्वारे प्राप्त संपूर्ण रक्कम नियमानुसार आणि प्रयोजनासाठी तसेच भारतीय

संविधानामध्ये नमूद केलेल्या पद्धती व्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणासाठी या निधी मधील कोणतीही रक्कम विनियोजित करता येत नाही. खर्चाचे काही प्रवर्ग राज्याच्या संचित निधीवर भारित असतात आणि विधानमंडळ त्या खर्चांना दत्तमत म्हणून मंजूर करत नाही. बाकी इतर सर्व खर्च विधानमंडळाद्वारे दत्तमत म्हणून दिले जातात.

**2. राज्याचा आकस्मिक निधी (भारतीय संविधानाचा अनुच्छेद 267(2))**

हा निधी तात्पुरत्या स्वरूपात असतो जो राज्य विधानमंडळाद्वारे नियमानुसार स्थापित केला जातो आणि राज्य विधानमंडळाद्वारे अशा खर्चाच्या अधिकृततेसाठी प्रलंबित असलेल्या आकस्मिक खर्चाच्या पूर्ततेसाठी राज्यपालांच्या ताब्यात ठेवला जातो. राज्याच्या संचित निधीशी संबंधित कार्यात्मक मुख्य शीर्षांतर्गत डेबिट करून ह्या निधीमध्ये परतफेड करण्यात येते.

**3. राज्याचा लोक लेखा (भारताच्या राजघटनेचा अनुच्छेद 266(2))**

वरील बाबींव्यतिरिक्त, जेथे शासन बँकर किंवा विश्वस्त म्हणून कार्य करते, शासनाकडून किंवा शासनाच्या वतीने प्राप्त झालेली इतर सर्व सार्वजनिक रक्कम लोक लेख्यामध्ये जमा केली जाते. लोक लेख्यांमध्ये लघु बचत आणि भविष्य निर्वाह निधी, ठेवी (व्याज प्रदान करणाऱ्या आणि व्याज न देणाऱ्या), अग्रिम, राखीव निधी (व्याज देणारे आणि व्याज न देणारे), वित्त प्रेषण आणि निलंबन शीर्ष (दोन्ही अस्थायी स्वरूपाचे शीर्ष आहेत, अंतिम नोंदणी प्रलंबित आहे) इत्यादि परतफेड करण्यायोग्य बाबींचा समावेश आहे. शासनाकडे उपलब्ध असलेली निव्वळ रोख शिल्लक सुद्धा लोक लेख्यांतर्गत समाविष्ट आहे. लोक लेखे विधानमंडळाद्वारे दत्तमत म्हणून मंजूर करत नाही.

प्रत्येक आर्थिक वर्षाच्या संदर्भात राज्य शासनाच्या अंदाजित आर्थिक जमा आणि खर्चाचे विवरण सभागृह किंवा राज्याच्या विधानमंडळाच्या सभागृहासमोर सादर करण्याची घटनात्मक (अनुच्छेद 202) आवश्यकता आहे. हे 'वार्षिक वित्तीय विवरण' मुख्य अर्थसंकल्पीय दस्तावेज तयार करते. यामध्ये समाविष्ट असतात:

- **महसूली जमांमध्ये** कर महसूल, करेतर महसूल, केंद्रीय कर/शुल्कांचा राज्याचा हिस्सा आणि केंद्र शासनाकडून प्राप्त झालेली अनुदाने अंतर्भूत असतात.

- **महसुली खर्चामध्ये** राज्य शासनाचे अशा प्रकारचे सर्व खर्च जे प्रत्यक्ष किंवा वित्तीय मालमत्ता निर्माण करत नाहीत, अंतर्भूत असतात. हे खर्च राज्य शासकीय विभागाच्या सर्वसाधारण प्रक्रिया आणि इतर सेवा यांवर करण्यात आलेला खर्च, राज्य शासनाद्वारे घेण्यात आलेल्या कर्जावरील व्याजाचे प्रदान आणि विविध संस्थांना दिलेले अनुदान (जरी काही अनुदाने मालमत्ता निर्मितीसाठी असतील तरी) यांच्याशी संबंधित असतात.


- **भांडवली जमा** बनलेली असतेः
  - **ऋण जमाः** बाजार कर्जे, बंधपत्र, वित्तीय संस्थांकडून कर्जे, अर्थोपाय अग्रिम, केंद्र शासनाकडून कर्जे आणि अग्रिमे इत्यादि;
  - **ऋणेतर जमाः** निर्गुंतवणूकीपासून उत्पन्न, कर्जे आणि अग्रिमांची वसुली;
- **भांडवली खर्चामध्ये** इमारती, संयंत्र, उपकरणे, जमीन अधिग्रहणावरील खर्च, इतर भागीदार आणि सार्वजनिक उपक्रमातील राज्य शासनाची भागांमधील गुंतवणूक आणि कर्जे आणि अग्रिमे अंतर्भूत असतात.

सद्‌यस्थितीत राज्य शासनाकडे लेखा वर्गीकरण प्रणाली आहे जी कार्यात्मक आणि आर्थिक आहे.

| | **व्यवहाराचे गुणधर्म** | **वर्गीकरण** |
|---|---|---|
| लेखा नियंत्रक द्वारे मुख्य आणि लघु शीर्षांच्या यादी मध्ये प्रमाणित | कार्ये - शिक्षण, आरोग्य इत्यादि/विभाग | अनुदानांतर्गत मुख्य शीर्ष (4-अंकी) |
| | उप-कार्ये | उप मुख्य शीर्ष (2-अंकी) |
| | कार्यक्रम | लघु शीर्ष (3-अंकी) |
| राज्यासाठी ठेवलेली लवचिकता | योजना | उप शीर्ष (2- अंकी) |
| | उपयोजना | सविस्तर शीर्ष (2- अंकी) |
| | आर्थिक पद्धती/कार्ये | उद्देश्य शीर्ष (2- अंकी) *वेतन, लघु कामे इत्यादि* |

कार्यात्मक वर्गीकरणावरून विभाग, कार्ये, योजना किंवा कार्यक्रम आणि खर्चाच्या बाबींची माहिती मिळते. आर्थिक वर्गीकरण महसूल, भांडवल, कर्ज इत्यादि प्रकारचे भुगतान करण्यास मदत करते. आर्थिक वर्गीकरण चार अंकी मुख्य शीर्षाच्या पहिल्या अंकात तर्कशास्त्रानुसार संख्यांकन संनिविष्ट करून साध्य केले जाते. उदाहरणार्थ 0 आणि 1 हे महसूली जमासाठी, 2 आणि 3 महसूली खर्चासाठी इत्यादि. आर्थिक वर्गीकरण हे अंतर्हित व्याख्या आणि काही बाब शीर्षाच्या वितरणावरून सुद्धा साध्य करता येते. उदाहरण "वेतन" चे उद्देश्य शीर्ष महसूल खर्च, "बांधकाम" चे उद्देश्य शीर्ष भांडवली खर्च आहे. अर्थसंकल्प दस्तावेजांमध्ये उद्देश्य शीर्ष हा विनियोजनाचा मूळ घटक आहे.

शासनाच्या लेख्यांच्या संरचनेचे सचित्र वर्णन खाली दिले आहे:




कार्यात्मक आणि आर्थिक व्यवहारांच्या सुविधांचे वर्गीकरण, शासकीय क्रियाकलाप/व्यवहारांच्या सखोल विश्लेषणासह निधी आधारित लेखांकन सार्वजनिक वित्त व्यवस्थे विषयी वैधानिक पर्यवेक्षण सक्षम करते.

## *अर्थसंकल्पीय प्रक्रिया*

भारतीय घटनेच्या अनुच्छेद 202 अनुसार राज्याच्या राज्यपालांनी वर्ष 2021-22 साठी राज्याच्या अंदाजित जमा आणि खर्चाचे विवरण **वार्षिक वित्तीय विवरणाच्या** स्वरूपात राज्य विधानमंडळासमक्ष सादर करणे आवश्यक आहे. अनुच्छेद 203 अनुसार अनुदाने/ विनियोजनासाठीच्या मागणी स्वरूपात हे विवरण राज्य विधानमंडळासमक्ष सादर करण्यात येते आणि त्यांच्या स्वीकृती नंतर संचित निधी मधून आवश्यक रक्कमेच्या विनियोजनासाठी विधानमंडळाद्वारे अनुच्छेद 204 अंतर्गत विनियोजन देयक पारित करण्यात येते.

जसे परिच्छेद 2 मध्ये उल्लेखित आहे की, राज्य वित्त लेखापरीक्षा अहवाल तयार करण्याकरिता मूळ माहिती वित्त लेखे आणि विनियोजन लेख्यांमधून घेतला जाते. 2021-22 दरम्यान राज्याच्या प्रत्यक्ष जमा आणि खर्चावर आधारित हे लेखे आहेत ज्यात विविध आंतर शासकीय आणि रिझर्व बँक ऑफ इंडिया द्वारे केलेले समायोजन अंतर्भूत आहे. ह्या जमा आणि खर्चाचा अर्थसंकल्पात अंदाज घेतला आहे आणि खर्चाला राज्य विधानमंडळाची मान्यता आहे असे

गृहित धरल्या जाते, राज्याचा 2021-22 चा अर्थसंकल्प जवळून अभ्यासणे, महत्वाचे आहे तसेच वर्षादरम्यानचा खर्च अर्थसंकल्पात अंदाजित केलेल्या संदर्भानुसार आहे.

महाराष्ट्र अर्थसंकल्पीय नियम पुस्तिकामध्ये अर्थसंकल्प मांडणीच्या प्रक्रियेचे विवरण दिले आहे आणि ते राज्य सरकारला अर्थसंकल्पीय अंदाज आणि खर्चावरील क्रियाकलापाच्या संनियंत्रणा बद्दल मार्गदर्शन करते. लेखापरीक्षेचे अर्थसंकल्पाच्या छाननीचे परिणाम आणि राज्य शासनाच्या इतर अर्थसंकल्पीय उपक्रमांची अंमलबजावणी ह्या अहवालाच्या **प्रकरण III** मध्ये वर्णिले आहे.

## 1.4.1 वित्ताचे दृतचित्र

2021-22 च्या अर्थसंकल्पीय अंदाजाच्या तुलनेत 2020-21 आणि 2021-22 वर्षांसाठी प्रत्यक्ष आर्थिक परिणामांचे दृतचित्र **तक्ता 1.2** प्रदान करते.

**तक्ता 1.2: प्रत्यक्षाच्या तुलनेत अर्थसंकल्पीय अंदाज**

**(₹ कोटी मध्ये)**

| अनु क्र. | घटक | 2020-21 प्रत्यक्ष | 2021-22 अर्थसंकल्पीय अंदाज | 2021-22 प्रत्यक्ष | प्रत्यक्षाची अर्थसंकल्पीय अंदाजाशी टक्केवारी | प्रत्यक्षाची स्थूल राज्य उत्पन्नाशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | कर महसूल | 200758.99 | 285533.97 | 275245.19 | 96.40 | 8.61 |
| (i) | स्वत:चा कर महसूल | 164254.98 | 243490.37 | 220927.13 | 90.73 | 6.91 |
| (ii) | केंद्रीय कर/शुल्काचा हिस्सा | 36504.01 | 42043.60 | 54318.06 | 129.19 | 1.7 |
| 2 | करेतर महसूल | 15975.46 | 26650.27 | 19306.70 | 72.44 | 0.60 |
| 3 | सहाय्यक अनुदान आणि अंशदान | 52733.46 | 56802.62 | 38759.68 | 68.24 | 1.21 |
| **4** | **महसूल जमा (1+2+3)** | **269467.91** | **368986.86** | **333311.57** | 90.33 | 10.42 |
| 5 | कर्जे आणि अग्रिमांची वसुली | 1612.35 | 2332.35 | 1178.88 | 50.54 | 0.04 |
| 6 | इतर जमा | 0 | 0.00 | 0 | 0 | 0 |
| 7 | उधारी आणि इतर दायित्व[(a)] | 71558.05[#] | 66641.35[#] | 64301.86 | 96.49 | 2.01 |
| 8 | **भांडवली जमा (5+6+7)** | **73170.40** | **68973.70** | **65480.74** | **94.94** | **2.05** |
| 9 | **एकूण जमा (4+8)** | **342638.31** | **437960.56** | **398792.31** | **91.06** | **12.47** |
| 10 | **ज्याचा महसूली खर्च** | **310609.76** | **379212.52** | **349685.89** | **92.21** | **10.94** |
| 11 | व्याज प्रदाने | 36969.77 | 42997.62 | 40158.04 | 93.40 | 1.26 |
| 12 | **ज्याचा भांडवली खर्च** | **32028.55** | **58748.04** | **49106.42** | 83.59 | 1.54 |
| 13 | भांडवली गुंतवणूक | 29686.70 | 55613.04 | 46670.39 | 83.92 | 1.46 |
| 14 | कर्जे आणि अग्रिम | 2341.85 | 3135.00 | 2436.03 | 77.70 | 0.08 |
| 15 | **एकूण खर्च** (10+12) | **342638.31** | **437960.56** | **398792.31** | 91.06 | 12.47 |
| 16 | **महसूल तूट/अधिशेष** (4-10) | **(-)41141.85** | **(-)10225.66** | **(-)16374.32** | **160.13** | **-0.51** |
| 17 | राजकोषीय तूट {(4 +5+6)-15} | **(-)71558.05** | **(-)66641.35** | **(-)64301.86** | **96.49** | **-2.01** |
| 18 | मूळ/प्राथमिक तूट (17-11) | **(-)34588.28** | **(-)23643.73** | **(-)24143.82** | **102.12** | **-0.76** |

[(a)] उधारी आणि इतर दयित्वे: लोक ऋणाची निव्वळ (प्राप्ती-संवितरण)+आकस्मिक निधीची निव्वळ+लोक लेख्याची निव्वळ (प्राप्ती-संवितरण) + सुरुवातीच्या आणि अखेरच्यारोख शिलकीची निव्वळ

[#] निम्न पूर्णांकित

वस्तू व सेवा कर नुकसान भरपाई हा वस्तू व सेवा कर (राज्याला नुकसान भरपाई) अधिनियम, 2017 अंतर्गत राज्य शासनाचा महसूल आहे. 2020-21 आणि 2021-22 या वर्षांत जीएसटी नुकसान भरपाई निधीमध्ये असलेल्या अपर्याप्त शिलकीमुळे ₹ 17,834.22 कोटी महसूल प्राप्ती व्यतिरिक्त केंद्र शासनाने निधी उधार घेतला आणि तो परतफेडीचे दायित्व न ठेवता बॅक टू बॅक कर्ज म्हणून राज्यांना दिला. महाराष्ट्राला 2021-22 मध्ये ₹ 13,782.36 कोटी आणि 2020-21 मध्ये ₹ 11,977 कोटी कर्ज मिळाले. या व्यवस्थेमुळे, 2021-22 या वर्षात ₹ 16,374.32 कोटींची महसुली तूट आणि ₹ 64,301.86 कोटीची राजकोषीय तूट वस्तू व सेवा कर भरपाईच्या बदल्यात ₹ 13,782.36 कोटी कर्ज प्राप्तीच्या संयोगाने वाचली जाऊ शकते.

### 1.4.2 शासकीय मालमत्ता आणि दायित्वाचे दृतचित्र

शासकीय लेख्यांमध्ये शासनाचे वित्तीय दायित्व आणि केलेल्या खर्चामधून निर्मित मालमत्ता याचा समावेश आहे. दायित्वामध्ये मुख्यत्वे आंतरिक कर्जे, भारत सरकारकडून घेतलेली कर्जे आणि अग्रिम, लोक लेखे आणि राखीव निधी मधून प्राप्त जमा आणि मालमत्तांमध्ये मुख्यत्वे राज्य शासनाद्वारे देण्यात आलेला भांडवली खर्च आणि कर्जे आणि अग्रिम तसेच रोख शिल्लक यांचा समावेश आहे. **तक्ता 1.3** मध्ये 31 मार्च 2021 च्या स्थितीच्या तुलनेत 31 मार्च 2022 रोजीच्या अशा दायित्व आणि मालमत्तांचा गोषवारा दिलेला आहे.

**तक्ता 1.3: मालमत्ता आणि दायित्वाच्या स्थितीचा सारांश**

**(₹ कोटी मध्ये)**

| **दायित्व** | | | | | **मालमत्ता** | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **2020-21** | **2021-22** | **टक्केवाढ** | | | **2020-21** | **2021-22** | **टक्केवाढ** |
| **संचित निधी** | | | | | | | | | |
| अ | आंतरिक कर्ज | 408036.24 | 445079.61 | 9.08 | अ | एकूण भांडवली खर्च | 389218.81 | 435889.20 | 11.99 |
| ब | भारत सरकारकडून घेतलेले कर्ज आणि अग्रिम | 20445.54 | 37955.69 | 85.64 | ब | कर्ज आणि अग्रिम | 26830.05 | 28087.20 | 4.69 |
| | **आकस्मिक निधी** | 150.00 | 150.00 | 0 | | | | | |
| **लोक लेखे** | | | | | | | | | |
| अ | लघु बचत, भविष्य निर्वाह निधी इत्यादि | 28190.29 | 29156.93 | 3.43 | अ | अग्रिम | 10.59 # | 13.11 | 23.80 |
| ब | ठेवी | 79196.83 | 81802.99 | 3.29 | ब | वित्त प्रेषण | | | |
| क | राखीव निधी | 58751.91 | 67435.73 | 14.78 | क | निलंबन आणि किरकोळ | | | |
| ड | वित्त प्रेषण | 1699.38* | 1110.65 | -34.64 | | रोख शिल्लक | 22152.94 | 22556.61 | 1.82 |
| | | | | | | राखीव निधी मध्ये गुंतवणूक | 46444.35 | 55135.68 | 18.71 |
| इ | निलंबन आणि किरकोळ | 12772.67* | 19952.23 | 56.21 | | **एकूण रोख** | **68597.29** | **77692.29** | **13.26** |
| | | | | | | महसूल लेख्यामध्ये तूट | 125119.84 | 141495.75$ | 13.09 |
| | | | | | | संकीर्ण भांडवली जमा | (-)533.72 | (-)533.72 | 0 |
| | **एकूण बेरीज** | **609242.86** | **682643.83** | **12.05** | | **एकूण बेरीज** | **609242.86** | **682643.83** | **12.05** |

स्त्रोतः संबंधित वर्षांचे वित्तीय लेखे

*उच्च पूर्णांकित #निम्न पूर्णांकित $प्रपत्रातील दुरूस्तीमुळे 2020-21 च्या वित्तीय लेख्यांमध्ये अंकांची सुधारणा $शासकीय लेख्यांमध्ये बंद केलेल्या रकमेचा समावेश आहे (₹ 1.59 कोटी)

मालमत्ता वाढीचा दर 2020-21 मधील 7.34 टक्क्यांवरून 2021-22 मध्ये 11.78 टक्क्यांपर्यंत वाढला, त्याचप्रमाणे दायित्वांच्या वाढीचा दर 2020-21 मधील 11.79 टक्क्यांवरून 2021-22 मध्ये 12.05 टक्क्यांपर्यंत वाढला. वर्षाच्या शेवटी राज्याची रोख शिल्लक ₹ 22,556.61 कोटी इतकी होती. मागील वर्षीच्या तुलनेत रोख रकमेत 1.82 टक्के वाढ झाली आहे.

## 1.5 राजकोषीय शिल्लकः तूट आणि एकूण कर्ज लक्ष्याची उपलब्धी

जेव्हा एखादे शासन संकलित केलेल्या महसुलापेक्षा जास्त खर्च करते तेव्हा त्यात तूट येते. अशा अनेक उपाययोजना आहेत ज्यात सरकारी तूट म्हणजेच महसूल तूट, राजकोषीय तूट आणि प्राथमिक तूट ह्यांचे मापन केल्या जाते. तूटीचे स्वरूप हे शासनाच्या राजकोषीय व्यवस्थापनाचे सूक्ष्म सूचक आहे. तसेच तूटीला कशाप्रकारे अर्थसहाय्य दिल्या जाते आणि उभारलेल्या संसाधनांचा वापर हे राज्याच्या राजकोषीय स्थितीचे महत्वाचे संकेतक आहेत. हा विभाग कल, स्वरूप परिमाण, ह्या तूटीला अर्थसहाय्य करण्याचे स्वरूप आणि महसूलाच्या प्रत्यक्ष स्तराचे निर्धारण आणि महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम 2005 अंतर्गत निर्धारित लक्ष्याच्या तुलनेत राजकोषीय तूट सादर करतो.

राजकोषीय व्यवस्थापनात आंतर पीढी इक्विटी आणि दीर्घकालीन मॅक्रो आर्थिक स्थिरतेचे उद्देश्य साध्य करण्याकरिता राज्य शासनाने महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम 2005, अधिनियमित केला आणि वेळोवेळी संशोधित केला. महसूली तूट, राजकोषीय तुटीमध्ये कमी आणि वित्तीय टिकावा सह विवेकी कर्ज व्यवस्थापनाचे पुरोगामी निर्मूलन ह्या अधिनियमांत अपेक्षित आहे.

महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियमावली फेब्रुवारी 2006 मध्ये तयार करण्यात आली आणि तद्नंतर वेळोवेळी संशोधित करण्यात आली. महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियम 2005, अनुसार राज्याचे एकूण दायित्व म्हणजे राज्याच्या संचित निधी आणि राज्याच्या लोक लेख्याअंतर्गत दायित्व. अशाप्रकारे, विस्तृत व्याख्येनुसार एकूण थकित ऋण/दायित्वात, संचित निधीवरील दायित्व, लोक लेख्यावरील दायित्व आणि राज्य सार्वजनिक उपक्रम तसेच सहाय्यक कंपनीद्वारे उधार आणि इतर समतुल्य साधने जेथे भांडवल आणि/अथवा व्याज राज्याच्या अर्थसंकल्पामधून दिले जाते अंतर्भूत असतात.

राजकोषीय तूट तीन टक्क्यांपेक्षा कमी आणि 2011-12 नंतर महसुली अधिशेष राखणे हे राज्याचे प्रमुख वित्तीय उद्दिष्ट होते. त्यानंतरच्या वर्षांमध्ये आणखी सुधारणा करून, 2013-14 ते 2021-22 या कालावधीत 2011-12 नंतर महसूल अधिशेष' संबंधित कलम शिथिल करण्यात आले. राज्याच्या वित्तव्यवस्थेवर महामारीच्या प्रतिकूल परिणामामुळे राज्य शासनाने, भारत सरकारच्या निर्देशानुसार 2020-21 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या दोन टक्के आणि 2021-22 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाच्या एक टक्का अतिरिक्त कर्ज घेण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार,

महाराष्ट्र राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियमावली (द्वितीय सुधारणा) अधिनियम 2021 नुसार 2021-22 साठी राजकोषीय तुटीचे लक्ष्य, स्थूल राज्य उत्पन्नाच्या चार टक्क्यांपर्यंत सुधारित करण्यात आले.

गेल्या पाच वर्षांच्या कालावधीत (2017-18 ते 2021-22) वित्तीय उत्तरदायित्वामध्ये विहित केलेल्या प्रमुख वित्तीय मापदंडांचे कल विश्लेषण **तक्ता 1.4** मध्ये दिले आहे.

**तक्ता 1.4: 2017-18 ते 2021-22 या कालावधीत अधिनियमात विहित केलेल्या प्रमुख वित्तीय लक्ष्यांचे कल विश्लेषण**

| राजकोषीय मापदंड | अधिनियमा मध्ये ठेवण्यात आलेले वित्तीय लक्ष्य | साध्य (₹ कोटी मध्ये) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | 2017-18 | 2018-19 | 2019-20 | 2020-21 | 2021-22 |
| महसूल तूट (-)/आधिक्य (+) (₹ कोटी मध्ये) | महसुली आधिक्य | 2082.49 | 11974.60 | (-)17115.63 | (-)41141.85 | (-)16374.32 |
| | | ✔ | ✔ | × | × | × |
| राजकोषीय तूट (-)(स्थूल राज्य उत्पन्नाची टक्केवारी) | चार टक्के | (-)23960.97 (-1.02) | (-)23015.33 (-0.90) | (-)53886.19 (-1.97) | (-)71558.05 (-2.64) | -64301.86 (-2.01) |
| | | ✔ | ✔ | ✔ | ✔ | ✔ |
| स्थूल राज्य उत्पन्नाच्या प्रमाणात एकूण शिल्लक ऋण (टक्क्यांमध्ये) | लक्ष्य | 16.26 | 16.52 | 15.83 | 16.15 | 20.64 |
| | साध्य | 18.38 | 17.01 | 17.55 | 19.77* | 18.53* |
| | | × | × | × | × | ✔ |

स्त्रोत: अर्थसंकल्पीय प्रकाशने आणि मागील वर्षांची वित्त लेखे

*व्यय विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार नुसार विशेष विंडो अंतर्गत घेतलेले कर्ज (₹13,782 .36 कोटी) हे वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे कर्ज म्हणून मानले गेले नाही इत्यादि.

**तक्ता 1.4** मध्ये दिसून आल्याप्रमाणे 2017-18 ते 2021-22 या पाच वर्षांच्या कालावधीत केवळ 2017-18 आणि 2018-19 मध्येच राज्य महसुली आधिक्य साध्य करू शकले. 2020-21 मधील ₹ 41,141.85 कोटींची महसुली तूट 2021-22 मध्ये कमी होऊन ₹ 16,374.32 कोटी झाली. 2021-22 मध्ये चार टक्क्यांच्या उद्दिष्टाच्या तुलनेत राजकोषीय तूट तीन टक्क्यांच्या खाली आटोक्यात आणण्यात राज्य यशस्वी ठरले.

## 1.5.1 राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियमावली मध्ये प्रक्षेपित राजकोषीय मापदंडांची चालू वर्षातील प्रत्यक्षाशी तुलना

राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन नियमावली, 2006 (2008 मध्ये यथा संशोधित) मध्ये विहित केल्यानुसार, मध्यम मुदतीचे राजकोषीय धोरणात्मक विवरण जे विहित राजकोषीय निदर्शकांसाठी लक्ष्य ठरविते, राज्य शासनाला राज्य विधानमंडळा समक्ष प्रस्तुत करावे लागते. 2021-22 करिता मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणात्मक विवरणाच्या प्रक्षेपणामधील बदल, 2021-22 चा वार्षिक अर्थसंकल्प आणि वर्षाच्या प्रत्यक्षासह जो विधानमंडळासमक्ष सादर केला, **तक्ता 1.5** मध्ये दर्शविला आहे.

**तक्ता 1.5: 2021-22 करिता मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणात्मक विवरणातील प्रक्षेपणाच्या तुलनेत प्रत्यक्ष**

| अनु क्र. | राजकोषीय अस्थिरता | MTFPS नुसार प्रक्षेपण | प्रत्यक्ष | बदल |
|---|---|---|---|---|
| | | (₹ कोटी मध्ये) | | (टक्क्यांमध्ये) |
| 1. | कर महसूल | 243490.37 | 220927.13 | (-)9.27 |
| 2. | करेतर महसूल | 26650.27 | 19306.70 | (-)27.56 |
| 3. | केंद्रीय करांचा हिस्सा | 42043.60 | 54318.06 | 29.19 |
| 4. | भारत सरकारकडून सहाय्य अनुदाने | 56802.62 | 38759.68 | (-)31.76 |
| 5. | महसुली जमा (1+2+3+4) | 368986.86 | 333311.57 | (-)9.67 |
| 6. | महसुली खर्च | 379212.50 | 349685.89 | (-)7.79 |
| 7. | महसुली तूट (-)/आधिक्य (+) (5-6) | (-)10225.64 | (-)16374.32 | 60.13 |
| 8. | राजकोषीय तूट (-)/आधिक्य (+) | (-)66640.83 | (-)64301.86 | (-)3.51 |
| 9. | प्राथमिक तूट | (-)23643.21 | (-)24143.82 | (-)2.12 |
| 10. | ऋण- स्थूल राज्य उत्पन्न गुणोत्तर (टक्के) | 20.64 | 18.53* | (-)10.22 |
| 11. | चालू किंमतीनुसार स्थूल राज्य उत्पन्न वृद्धी दर | 12.00 | 17.93 | 49.42 |


*व्यय विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार नुसार विशेष विंडो अंतर्गत घेतलेले कर्ज (₹ 13,782 .36 कोटी) हे वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे कर्ज म्हणून मानले गेले नाही इत्यादि.

स्त्रोतः आर्थिक लेखे आणि अर्थसंकल्पीय दस्तावेज 2021-22

वरील **तक्ता 1.5** वरून दिसून येते की, मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणात्मक विवरणामध्ये (MTFPS) केलेल्या अंदाजांच्या तुलनेत 2021-22 दरम्यान केवळ केंद्रीय करांमधील वाटा लक्षणीयरीत्या सुधारला आहे. 2021-22 दरम्यान कर महसूल, करेतर महसूल, सहाय्य अनुदान, प्राथमिक तूट आणि राजकोषीय तूट भरून निघाली नाही, राजकोषीय दायित्वे (एकूण प्रलंबित ऋण) आणि स्थूल राज्य उत्पन्नाचे गुणोत्तर (18.53 टक्के) मध्यम मुदतीच्या राजकोषीय धोरणात्मक विवरणाच्या लक्ष्यापेक्षा (अर्थसंकल्पीय अंदाज 20.64 टक्के आणि सुधारित अंदाज 17.90 टक्के) आणि पंधराव्या वित्त आयोगाने शिफारस केलेल्या मर्यादेपेक्षा (26.0 टक्के) कमी होते.

## 1.5.2 तूट/आधिक्य यांतील कल

पाच वर्षांच्या (2017-18 ते 2021-22) कालावधीतील आधिक्य/तुटीचा कल **आलेख 1.3** मध्ये दर्शविला आहे, स्थूल राज्य उत्पन्नाच्या सापेक्ष आधिक्य/तुटीचा कल **आलेख 1.4** मध्ये दिला आहे आणि राजकोषीय दायित्वे आणि स्थूल राज्य उत्पन्नाचा कल **आलेख 1.5** मध्ये दिला आहे.




(स्त्रोतः संबंधित वर्षाचे वित्त लेखे)

### *महसुली आधिक्य/तूट*

2017-18 मधील महसुली आधिक्य ₹ 2,082 कोटी **(आलेख 1.3)** वरुन वाढून 2018-19 मध्ये ₹ 11,975 कोटी झाले. 2019-20 मध्ये महसुली आधिक्याचे रूपांतर महसुली तोट्यात (₹ 17,116 कोटी) झाले आणि 2020-21 मध्ये अजून वाढून ₹ 41,142 कोटी झाले. 2021-22 मध्ये महसुली तूट कमी होऊन ₹ 16,374 कोटी झाली.


### *राजकोषीय तूट*

2017-18 मधील राजकोषीय तूट, ₹ 23,961 कोटी **(आलेख 1.3)** 2018-19 मध्ये कमी होऊन ₹ 23,015 झाली. राजकोषीय तूट 2019-20 आणि 2020-21 मध्ये अनुक्रमे ₹ 53,886 कोटी आणि ₹ 71,558 कोटींपर्यंत प्रचंड वाढली. 2021-22 मध्ये राजकोषीय तूट ₹ 64,302 कोटी इतकी कमी झाली.

### *प्राथमिक अधिशेष/तूट*

2017-18 आणि 2018-19 मध्ये अनुक्रमे ₹ 9,057 कोटी आणि ₹ 11,006 प्राथमिक आधिक्य होते. 2019-20 मध्ये प्राथमिक तूट होती (₹ 20,325 कोटी) ज्यात पुढे 2020-21 मध्ये वाढ होऊन ₹ 34,588 कोटी झाली. 2021-22 मध्ये, प्राथमिक तूट कमी होऊन ₹ 24,144 कोटी झाली.

**आलेख 1.4: स्थूल राज्य उत्पन्नाच्या सापेक्ष आधिक्य/तूटीचा कल**





(स्त्रोतः संबंधित वर्षाचे वित्त लेखे)

**आलेख 1.4** मध्ये दर्शविल्यानुसार 2021-22 मध्ये स्थूल राज्य उत्पन्नाशी सापेक्ष तुटीच्या मापदंडात (महसुली तूट, राजकोषीय तूट आणि प्राथमिक तूट) 2020-21 च्या तुलनेत लक्षणीय घट झाली आहे.

**आलेख 1.5: राजकोषीय दायित्व आणि स्थूल राज्य उत्पन्नातील कल**

**(₹ कोटीमध्ये)**




(स्त्रोतः संबंधित वर्षाचे वित्त लेखे)

राज्याचे राजकोषीय दायित्व 2017-18 मधील ₹ 4,32,415 कोटींवरून 2021-22 मध्ये ₹ 6,06,295 कोटी झाले. 2021-22 दरम्यान एकूण राजकोषीय दायित्वांपैकी अंतर्गत ऋण 73.41 टक्के, भारत सरकार कडून कर्जे 6.26 टक्के आणि लोक लेख्यातील कर्जे 20.33 टक्के होती.

2021-22 दरम्यान थकित ऋणाचे स्थूल राज्य उत्पन्नाशी गुणोत्तर 18.53[1] टक्के, जे राजकोषीय जबाबदारी आणि अर्थसंकल्पीय व्यवस्थापन अधिनियमाद्वारे विहित मर्यादेपेक्षा (20.64 टक्के) कमी होते.

## 1.6 लेखापरीक्षणाद्वारे तपासणीनंतर उणीवा

महसूली खर्चाचे भांडवली खर्चाखाली चुकीचे वर्गीकरणामुळे तूटीच्या आकडेवारीवर भांडवलाचा परिणाम होतो. याशिवाय, स्पष्ट दायित्वे पुढे ढकलणे, एकत्रित निधीमध्ये उपकर/रॉयल्टी जमा न करणे, नवीन पेन्शन योजनेसाठी कमी योगदान, कर्ज निवारण आणि विमोचन निधी इत्यादींचा देखील महसूल आणि राजकोषीय तुटीच्या आकडेवारीवर परिणाम होतो. प्रत्यक्ष तुटीच्या आकड्यांपर्यंत पोहोचण्यासाठी अशा अनियमिततेचा उलट परिणाम करणे आवश्यक आहे.

**तक्ता 1.6** मध्ये 2021-22 दरम्यान निधीत कमी/गैर-अंशदान आणि राज्य शासनाकडून चुकीचे वर्गीकरण/बुकिंग लक्षात घेऊन प्रत्यक्ष आधिक्य/तुटीचे मूल्यांकन केले जाते.

**तक्ता 1.6: 2021-22 मधील महसुली तूट आणि राजकोषीय तूट यावर काही व्यवहारांचा प्रभाव**

| तपशील | महसूल तुटीवर प्रभाव (कमी दाखविले (+) जास्त दाखविले (-)) (₹ कोटी मध्ये) | राजकोषीय तुटीवर प्रभाव (कमी दाखविले) (₹ कोटी मध्ये) | परिच्छेदाचा संदर्भ |
|---|---|---|---|
| महसूली खर्चाऐवजी भांडवली खर्च बुक केला | (+)1662.63 | -- | प्रकरण 3 परिच्छेद 3.3.6 |
| राखीव निधी आणि व्याज असलेल्या ठेवी विरूद्ध व्याजाचे असमायोजन | (+)667.83 | 667.83 | प्रकरण 4 परिच्छेद 4.2 |
| नवीन निवृत्ती वेतन योजने अंतर्गत जमा निधी जास्त हस्तांतरण | (-)586.41 | 586.41 | प्रकरण 2 परिच्छेद 2.4.2.3 |
| उपकराचे अहस्तांतरण | (+)1029.27 | 1029.27 | प्रकरण 2 परिच्छेद 2.5.2.5 |
| **एकूण** | **3946.14** | **2283.51** | |
| स्त्रोत: 2021-22 चे वित्त लेखे | | | |

- इंडियन गव्हर्नमेंट अकाउंटिंग स्टॅंडर्ड्स-2 हे विहित करते की सहाय्य अनुदान हे महसूल खर्चाच्या अंतर्गत बुक केले जावे. तथापि, राज्य शासनाने चुकीच्या पद्धतीने ₹ 1,662.63 कोटींचे सहाय्य अनुदान महसूल अनुभागाच्या ऐवजी भांडवली अनुभागामध्ये अर्थसंकल्पित आणि बुक केले.
- राखीव निधी आणि व्याज असणाऱ्या ठेवींच्या अंतर्गत असलेल्या गुंतवणूक न केलेल्या शिलकींवर राज्य शासनाने व्याज देणे आवश्यक होते. राखीव निधीवरील व्याज देयता चार

[1] व्यय विभाग, वित्त मंत्रालय, भारत सरकार नुसार विशेष विंडो अंतर्गत घेतलेले कर्ज (₹ 13,782.36 कोटी) हे वित्त आयोगाने विहित केलेल्या कोणत्याही निकषांसाठी राज्याचे कर्ज म्हणून मानले गेले नाही.

टक्के (अर्थोपाय अग्रिमासाठी सरासरी व्याज दर) आणि व्याज असणाऱ्या ठेवी आणि अग्रिमांसाठी 7.1 टक्के दराने ₹ 667.83 कोटी झाले, जे प्रदान केले गेले नाही.

- नोव्हेंबर 2005 किंवा त्यानंतर नियुक्त केलेले राज्य शासनाचे कर्मचारी राष्ट्रीय पेंशन योजनेंतर्गत समाविष्ट आहेत, जी एक परिभाषित योगदान पेंशन योजना आहे.एकूण योगदान (नियोक्ते आणि कर्मचारी) नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड/विश्वस्त बँकेद्वारे नियुक्त निधी व्यवस्थाकाकडे हस्तांतरित केले जावे. 2021-22 या वर्षात, कर्मचाऱ्यांच्या योगदानाच्या तुलनेत राज्य शासनाने राष्ट्रीय पेंशन योजनेमध्ये ₹ 2,556.81 कोटीं ऐवजी ₹ 3,143.22 कोटींचे योगदान दिले, परिणामी ₹ 586.41 कोटींचे अतिरिक्त हस्तांतरण झाले.
- राज्याच्या संचित निधी अंतर्गत जमा झालेले ₹ 1,029.77 कोटी उपकर (श्रम उपकर व्यतिरिक्त) राखीव निधीमधील संबंधित निधी खात्यात हस्तांतरित केला गेला नाही.

**तक्ता 1.6** वरून दिसून आल्याप्रमाणे, 2021-22 मध्ये महसुली तूट आणि राजकोषीय तूट अनुक्रमे ₹ 3,946.14 कोटी आणि ₹ 2,283.51 कोटी कमी सांगण्यात आली. अशा प्रकारे, गैर-योगदान, दायित्वांचे निर्वहन न करणे आणि चुकीचे वर्गीकरण या बाबींचा समावेश केल्यास, महसुली तूट ₹ 20,320.46 कोटी असेल.